प्रा. (डॉ.) भालबा विभूते, एम.ए., पीएच.डी.
संचालक व विभाग प्रमुख
Prof. (Dr.) Bhalba Vibhute, M. A., Ph.D.
DIRECTOR & HEAD

प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.
DEPARTMENT OF ADULT AND CONTINUING EDUCATION & EXTENSION WORK
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004.

एसयु/एसीई/प्र.मान्यता/

दिनांक : ०२/०८/२०१३

प्रति,
मा. प्राचार्य,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
यादोगोपाळ पेठ, सातारा

विषय :- मोडी लिपी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम (१० दिवस) सुरू करणेबाबत...

महोदय/महोदया,

आपण मागणी केल्याप्रमाणे प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागामार्फत आपणास मोडी लिपी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम (१० दिवस) सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तरी, खालील बाबींची पूर्तता करून सदरचा वर्ग सुरू करण्याबाबत कार्यवाही सुरू करावी.

१. सोबत जोडलेल्या प्रवेश अर्जाच्या झेरॉक्स प्रती काढून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पात्रतेच्या दाखल्याची सत्यप्रत जोडून प्रवेश अर्ज आपल्याकडे ठेवावेत.
२. वर्गात ८०% उपस्थिती असणा-या विद्यार्थ्यांनाच परीक्षेस बसता येईल.
३. अभ्यासक्रमात दिल्याप्रमाणे थेअरी व प्रात्यक्षिक तास घेण्यात यावेत.
४. सदरचा वर्ग दि. १० ऑगस्ट २०१३ पासून सुरु होणे आवश्यक आहे.
५. महाविद्यालयाकडे जमा होणा-या शैक्षणिक शुल्काच्या २०% फी (रू २१०/- च्या प्रमाणात) आणि प्रवेश फी प्रत्येकी रू. २५/- व माजी विद्यार्थी संघटना फी प्रत्येकी रु. २५/- या प्रमाणे प्रत्येकी या प्रमाणे मा. वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे डी.डी. काढून तो विभागात दि. २० ऑगस्ट, २०१३ पर्यंत जमा करावा.
६. विद्यार्थ्यांची नावे दूरध्वनी क्र. व पत्यासहित व इंग्रजी आद्याक्षराप्रमाणे (इंग्रजी /मराठीमध्ये) तसेच अनु.जाती., अनु.जमाती.,विमुक्त भटक्या जमाती या संवर्गाचा उल्लेख करुन यादी व वेळापत्रक तसेच शिक्षकांची नावे व दूरध्वनी क्रमांक व पत्यासहित यादी डी.डी.सोबत विभागाकडे पाठवून द्यावे. विद्यार्थ्यांच्या यादींमधील नावांमध्ये नंतर कोणताही बदल करण्यात येणार नाही. सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार यादी द्यावी.
७. अभ्यासक्रमाचे रेकॉर्ड, जमा खर्चाच्या नोंदी स्वतंत्रपणे ठेवाव्यात आणि विद्यापीठाने मागणी केल्यास त्याची पूर्तता करावी.
८. विभागाच्या नियमाचे पालन होत नाही असे निदर्शनास आल्यास आपल्याला अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत दिलेली मान्यता काढून घेतली जाईल.
९. वर्ग सुरू करण्यापूर्वी किमान ७ दिवस अगोदर विभागात लेखी कळविणे आवश्यक आहे.
१०. प्रवेश फॉर्मवर असलेल्या नावात परीक्षा फॉर्म भरताना केलेला बदल ग्राहय धरला जाणार नाही. आपण दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे आणि यापुढेही आपला सततचा सहभाग मिळावा, ही अपेक्षा.

कळावे,

ARTS AND COMMERCE COLLEGE
SATARA-2.
Inward No. 22\432
Date: 6 AUG 2013

प्रा.जी.जी.भ्रयस
६।८।१३

आपला विश्वासू,

प्रा.(डॉ).भालबा विभूते
संचालक व विभागप्रमुख

Tel. : Office : (0231) ~~2605703, 6450347~~ 2609150, 2609151, 2605703 □ Fax : 0091-231-2605703 □ E-mail : ~~bhalba@indiatimes.com~~ Vbhalba@gmail.com

Scanned by CamScanner